Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# "तथागत बुध्दांची वर्ण विरहीत विचारधारा "



**नरवाडे जळबा मेश्राम**
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय बदनापूर, जि. जालना
इमेल :- narwadejm@gmail.com

सिध्दार्थ गौतमाच्या जन्माच्या वेळी व त्यापूर्वी भारतातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, समाजामध्ये विषमता पसरलेली होती. समाजाची विभागणी चार वर्णात झालेली होती. वर्णव्यवस्था अशी व्यवस्था होती की, माणसाच्या कार्याला काही महत्व नव्हते. एखादी व्यक्ती कर्माने कितीही वाईट असली आणि त्याचा जन्म वरिष्ठ वर्णात झाला असेल तर तो श्रेष्ठच ठरत असे. त्यावेळी एक म्हण प्रचलित झाली होती, “ब्राम्हण कितीही झाला भ्रष्ट, तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ.” वर्ण श्रेष्ठत्वामुळे सर्व समाजावर एकाच वर्णाचे वर्चस्व होते. विषमतेमुळे समाजातील बहुसंख्य लोक त्रस्त होते, दुःखी होते. त्यांना जीवनाचा मार्ग सापडत नव्हता. त्या काळी अनेक प्रकारचे मतप्रवाह होते. त्यामध्ये ढोबळमानाने बासष्ट प्रकारचे मिथ्या दृष्टीने लोक भरकटत होते. शुद्र व स्त्रियांची अवस्था आणखीनच वाईट होती. शूद्रांना ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही वर्णाची सेवा करण्याचे बंधन होते. स्त्रियांना चूल आणि मुल हेच त्यांचे जग होते. धनवान लोक गुलाम, दास बाळगत असत त्यांची पिळवणूक केली जात असे.

तथागत सम्यक सम्बुध्दाने जातीभेदाचे वेळोवेळी खंडन केले आहे. त्यांना वर्णव्यवस्थेतील जाती व्यवस्था मान्य नव्हती. वर्णव्यवस्थेतील जातीव्यवस्था जन्मावर आधारित आहे. मात्र तथागतांनी कर्माला महत्वाचे स्थान दिले व कर्मामुळे मनुष्य श्रेष्ठ ठरत असतो व कर्मानेच त्याची सुगती अथवा दुर्गती होते हे सांगितले त्यामुळे कर्म श्रेष्ठ आहे. तथागतांनी स्थापन केलेला धम्म अथांग महासागरासारखा आहे. महासागराला लहान-मोठ्या नद्या येऊन मिळतात व सागराला मिळाल्यावर त्यांचे अस्तित्व संपून त्याला महासागर असे संबोधल्या जाते त्याचप्रमाणे तथागताच्या धम्मामध्ये विलीन झालेल्या वेगवेगळया जाती धर्माच्या, वेगवेगळया वर्णाच्या लोकांना त्यांच्या जाती धर्माच्या, वर्णाच्या नावाने न ओळखता 'बौध्द धर्मीय' या नावाने ओळखले जाते. बौध्द धम्मात अनेक पंथ आहेत. परंतु त्या सर्व पंथाना **"बौध्द"** या नावानेच ओळखले जाते.

तथागतांच्या धम्मामध्ये वर्णावरून अथवा जातींवरून भेदभाव नव्हता हे सिद्ध करणारे पहिले उदाहरण म्हणजे उपालीची प्रवज्या होय. उपाली हा कपिलवस्तू नगरातील शाक्यांची सेवा करणारा एक साधा न्हावी होता. तथागताला सम्यक संबोधि प्राप्त झाली. राजा शुद्धोदनच्या आमंत्रणावरून तथागतांनी कपिलवस्तूला भेट दिली.[१] त्यानंतर तथागत बुध्द मल्लांच्या अनुपिया नावाच्या नगरा मध्ये विहार करत होते. त्यावेळी भद्दीय शाक्य, अनुरुध्द, आनंद, भृगु, किम्बिल, देवदत्त राजकुमार व उपाली न्हावी तथागतांना भेटून प्रवज्जित होण्यासाठी कपिलवस्तू सोडून अनुपिया नगराकडे निघाले. तेथे पोहोचल्यावर त्यांनी तथागतांना विनंती केली की, उपालीला आमच्या अगोदर प्रवज्जित करावे कारण शाक्यांना त्यांच्या कुळाचा अभिमान असतो व ते इतरांना कमी लेखतात. उपालीची प्रवज्जा अगोदर झाली तर तो आम्हाला ज्येष्ठ होईल व आम्हाला त्याला वंदन करावे लागेल. त्यांचे म्हणने योग्य समजून तथागतांनी उपालीला सर्वप्रथम प्रवज्जित केले व आपल्या भिक्खुसंघात समाविष्ट करून घेतले. हेच उपाली पुढे चालून विनयामध्ये सर्वश्रेष्ठ ठरले व प्रथम धम्मसंगिति मध्ये त्यांनी विनयाचे संगायन केले. यावरून भिक्खुसंघात व पर्यायाने बौध्द धम्मात वर्णभेद पाळला जात नव्हता हे सिद्ध होते.

दीघनिकायातील अंबट्ठ सुत्तामध्ये कोसल देशातील इच्छानंगल गावच्या उक्कट्ठानगरीत राहणाऱ्या पोक्खरसाती नावाच्या ब्राम्हणाच्या अंबट्ठ नावाच्या ब्राम्हण शिष्याला तथागत भगवान बुध्दाकडे ते खरच बुध्द आहेत की नाही याची खात्री करण्यासाठी पाठविले असता अंबट्ठ व भगवान बुध्दांमध्ये झालेल्या संवादाची माहिती आहे.[२] अंबट्ठ ब्राम्हण होता व त्याला ब्राम्हण

असल्याचा गर्व झाला होता तो ब्राम्हणाशिवाय इतरांना तुच्छ समजत होता. इतरांनी ब्राम्हणांचा नेहमी मान-सन्मान केला पाहिजे कारण ब्राम्हण श्रेष्ठ असतात अशी त्याची समजूत होती. त्याचा हा गैरसमज दूर करण्यासाठी तथागतांनी अंबट्ठ ब्राम्हणाच्या कुळाचा इतिहास सांगून त्याचा हीनपणा दाखवून दिला व जातीअभिमान बाळगणे अयोग्य आहे असे त्याला पटवून दिले. अंबट्ठाचे गर्वहरण झाले कुळाच्या हीनपणामुळे स्वतःवर नाराज झालेल्या अंबट्ठाचे समाधान करण्यासाठी त्याच्या कुळाचा मूळ पुरुष कण्ह ऋषी किती पराक्रमी होता व त्याने ओक्काक (इक्ष्वाकु) राजालाही कसे खाली पहावयास लावले याची पार्श्वभूमी सांगितली.

त्यानंतर क्षत्रियकुमार व ब्राम्हणकन्या यांचा संवास झाल्यास उत्पन्न होणाऱ्या संततीला ब्राम्हण त्याला स्वीकारतील परंतु क्षत्रिय अस्वीकार करतील कारण तो आईच्या बाजूने शुद्ध नाही. तद्वतच ब्राम्हणकुमार व क्षत्रियकन्या यांच्या संवासातून निर्माण झालेल्या पुत्राला स्वीकारायला ब्राम्हण तयार होतात परंतु क्षत्रिय तयार होत नाहीत कारण पित्याच्या बाजूने तो अशुद्ध आहे.

यावरून ब्राम्हणापेक्षा क्षत्रिय श्रेष्ठ ठरतात असे सिद्ध होते असे तथागतांनी अंबट्ठ ब्राम्हणाला पटवून दिले. यानंतर तथागतांनी जन्मापेक्षा विद्या व आचरणाने मनुष्य कसे श्रेष्ठत्व प्राप्त करू शकतो याचे विश्लेषण करून अंबट्ठ ब्राम्हणाला भिक्खु आचरणाने कसा शीलसंपन्न होतो, ध्यानाच्या चार पायऱ्या संपादन करून त्यात विहार करतो व अर्हंत पदाला पोहचून जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो याची माहिती सांगितली व त्याला व त्याच्या गुरूला (पोक्खरसातीला) याची माहिती आहे काय? असे विचारले असता माहिती नसल्याचे अंबट्ठाने सांगितले. जन्माने श्रेष्ठत्व प्राप्त होत नाही तर अथक प्रयत्नाने शील, समाधी व प्रज्ञेने श्रेष्ठत्व प्राप्त करता येते हे अंबट्ठ ब्राम्हणाला पटवून दिले. अंबट्ठ परत गेला व घडलेला सर्व वृतांत आपल्या गुरूला अर्थात पोक्खरसातीला सांगितला. ते ऐकून पोक्खरसातीला वाटले उगाच अंबट्ठला भगवान बुध्दाकडे पाठवले. पोक्खरसातीच्या मनात भगवंताला भेटण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे तो भगवंताची भेट घेण्यासाठी इच्छानंगल येथे गेला. भगवंताला वंदन करून एका बाजूला बसला व अंबट्ठ व भगवान बुध्दांचा काय संवाद झाला अशी विचारणा केली भगवान बुध्दांनी झालेला संवाद सांगितल्यावर अंबट्ठ मूर्ख आहे त्याला क्षमा करावी असे पोक्खरसाती बुध्दाला म्हणाला तेव्हा, “अंबट्ठ सुखी राहो, ब्राम्हणा” असे उद्गार तथागतांनी काढले. त्यानंतर महापुरुषाची बत्तीस लक्षणे तथागतामध्ये असल्याची खात्री पोक्खरसातीला झाल्यावर त्याने

*All rights reserved.*

तथागातला भोजनाचे आमंत्रण दिले. त्यानुसार भोजनानंतर तथागतांनी पोक्खरसातीला धम्मोपदेश केला तो ऐकून त्याच्यामध्ये प्रज्ञाचक्षु जागा झाला, त्याचे चित्तमल नष्ट झाले, चार आर्यसत्याचे ज्ञान झाले. जे उत्पन्न होते ते काही काळाने नष्ट होणार आहे हा कार्यकारणभाव समजला व तो तथागतांना शरण गेला त्यांचा उपासक बनला.

उपरोक्त सुत्तामध्ये तथागतांनी ब्राम्हण जातीचा अभिमान व गर्व बाळगणाऱ्या अंबट्ठ ब्राम्हणाचा जात्याभिमान खोटा ठरविला. ह्या सुत्तामध्ये तथागतांनी जातीवादाचा विरोध केला आहे. जातीवादाचे बंधन, गोत्रवादाचे बंधन, मान-सन्मानवाद बंधन आणि आवाह-विवाह बंधन सोडून अनुपम विद्या आणि आचरणाचे संपादन करण्याचा उपदेश दिलेला आहे.

वरील सुत्तामध्ये तथागतांनी आपल्या धम्माचा मुख्य उद्देश प्राणीमात्रांच्या जीवनातील दुःख दूर करून त्यांना निर्वाण सुखाचा मार्ग दाखवणे हे आहे. वर्णव्यवस्थेमध्ये स्त्रिया व शूद्रांना वेदपठणाची बंदी होती असा भेदभाव तथागतांच्या धम्मामध्ये नव्हता. सर्वांना समान दर्जा होता. त्यांच्या संघामध्ये ज्याप्रमाणे ब्राम्हण व क्षत्रिय होते, तसेच उपाली नावाचा न्हावी होता जे आपण सुरुवातीला पाहिले आहे. त्याचप्रमाणे सुनीत नावाचा सफाईगार, सोपाक चांडाल होता, स्वाती कोळी होता, नंद नावाचा गुराखी होता, विमला, आम्रपाली, पूर्णा, चापा इत्यादी भिक्खुणीही खालच्या जातीतून आल्या होत्या संघात आल्यावर त्यांना समान दर्जा प्राप्त होत असे व कोणताही भेदभाव पाळला जात नसे. तथागताच्या मतानुसार शील, समाधी, प्रज्ञेचे आचरण करून अर्हंत पदाला पोहोचलेल्या व्यक्तीला ब्राम्हण समजावे.

पृथ्वीवरील वनस्पती, किटक, चार पायावर चालणारे पशू, सरपटणारे प्राणी, पक्षी, जलचर यांमध्ये जाती असतात माणसांमध्ये जाती नाहीत असे तथागातांचे मत होते. त्यांच्या काळात प्रचलित असलेल्या वर्णव्यवस्थेत मात्र याच्या विपरीत माणसा-माणसांमध्ये भेद केला जात असे जन्मानुसार उच-निच ठरविले जात होते. ब्रम्हाच्या मुखातून ब्राम्हणाचा जन्म, बाहुतून क्षत्रियांचा, नाभीतून वैश्याचा तर पायातून क्षुद्रांचा जन्म झाल्याचे सांगितले जात होते ह्या सर्व विचारांना तथागतांनी छेद दिला. वरील सुत्ताबरोबरच मज्झिमनिकायातील अस्सलायन सुत्तामध्ये सुद्धा तथागतांनी वर्णभेद कशा प्रकारे अयोग्य आहे हे सांगितले त्यांनी अश्वलायन नावाच्या ब्राम्हणाला सांगितले की, ब्राम्हण स्त्रिया ऋतुमती होतात, गरोदर होतात, प्रसूत होतात

आणि मुलांना दुध पाजतात. यावरून हे स्पष्ट होते की, ब्राम्हण हे इतर लोकांप्रमाणेच योनीज आहेत. ते ब्रम्हाच्या मुखातून उत्पन्न झालेले नाहीत तर इतर स्त्रिया ज्या प्रमाणे प्रसवतात व अपत्याला जन्म देतात त्याचप्रमाणे ब्राम्हणाचा सुद्धा जन्म होतो. ब्राम्हणाच्या म्हणण्यानुसार जाती पूर्वापार चालत आल्या आहेत तसेच त्या न बदलणाऱ्या आहेत. हे म्हणणे खोटे आहे. योन कंबोज व इतर सीमावर्ती प्रदेशात आर्य व दास असे दोनच वर्ग असून कधी कधी आर्याचा दास होतो व कधी कधी दासाचा आर्य होतो.

शारीरिक शुद्धता शुद्धतेविषयी विचार केला असता असे दिसून येईल की, ब्राम्हण व शूद्राने नदीत स्नान केले असता दोघेही सारखेच स्वच्छ होतील, त्याचप्रमाणे एखाद्या क्षत्रियाने अथवा ब्राम्हणाने चंदनाची लाकडे एकमेकांवर घासून उत्पन्न केलेला अग्नी व एखाद्या क्षुद्राने एरंडाच्या काठ्या घासून उत्पन्न केलेला अग्नी दोन्हीही सारखेच तेजस्वी असतात.

त्यामुळे वर्णाभिमान व जाती अभिमानापेक्षा कुशल कर्म करून समाधी मार्गाचा अवलंब करून, शिलाचार करून निर्वाण प्राप्त करून घेतल्यास तो पुरुष अथवा स्त्री श्रेष्ठ ठरेल. दीघनिकायातील “सोणदण्ड सुत्ता” मध्ये अंगदेशातील चंपानगरीच्या सोणदण्ड ब्राम्हणाच्या ब्राम्हण कोणास म्हणावे? या मिथ्या धारणेचे तथागत बुध्दांने कश्याप्रकारे खंडन केले व त्याला उपदेश केला याचे वर्णन आलेले आहे.[३]

जन्माने कुणीही ब्राम्हण होत नाही व जन्माने कुणीही हीन होत नाही. या विषयी “सुत्तनिपात” या ग्रंथात श्रावस्ती येथील आग्निक भारद्वाज ब्राम्हण व तथागत भगवान बुध्द यांचा संवाद आलेला आहे. श्रावस्तीमध्ये भिक्षाटन करीत असतांना तथागतांना दुरूनच पाहून आग्निक भारद्वाज ब्राम्हण म्हणाला, “हे मुण्डक, हे श्रमणक, हे वृषलक, तेथेच उभा राहा”[४]

त्यावर तथागतांनी त्याला विचारले, “हे ब्राम्हणा तू वृषल कोण व वृषलाचे गुण कोणते हे जाणतोस काय?” “गौतमा वृषल किंवा वृषलाचे गुण कोणते हे मी जाणत नाही. भगवान गौतमाने असा धर्मोपदेश करावा की जेणेकरून वृषल कोण वृषलाचे गुण कोणते हे मी जाणू शकेल.” तेव्हा हे ब्राम्हणा, निट लक्ष देऊन ऐक वृषल म्हणजे रागीट, पापी, गुणीजणांना दोष लावणारा, सूड उगवण्याची बुध्दी ठेवणारा मायावी माणसाला वृषल समजावे, जो प्राण्यांची हत्या करतो, गावांची लुट करतो, जबरदस्तीने दुसऱ्यांच्या वस्तू लुबाडतो, कर्ज घेऊन बुडवतो, वाटसरूंना

लुटतो, स्त्रियांशी व्याभिचाराने वागतो, वयोवृद्ध आई-वडिलांचे पालन पोषण करीत नाही इ. याप्रमाणे ज्याचे आचरण असते त्याला वृषल समजावे" असे सांगून शेवटी म्हणाले.

*"न जच्चा वसलो होति न जच्चा होति ब्राम्हणो ।*

*कम्मुना वसला होति कमुन्ना होति ब्राम्हणो" ॥*

अर्थात:- "जन्माने कोणी वृषल होत नाही व जन्माने कोणी ब्राम्हण होत नाही. कर्माने वृषल होतो व कर्माने ब्राम्हण होतो."

भिक्खुसंघामध्ये अनेक जाती धर्माचे, गोत्राचे, अनेक कुळातील परिव्राजक सामील झाल्यामुळे त्यांची पूर्वीची जातीवरून, गोत्रावरून असणारी ओळख संपून ते केवळ 'बौध्द धम्मीय' म्हणूनच ओळखले जातात. त्यामुळे जातिभेदाला व वर्णभेदाला बौध्दधम्मामध्ये कोणतेही स्थान नाही. वर्णव्यवस्थेचे खंडन करतांना मज्झिमनिकायातील 'एसुकारि सुत्ता'[५] मध्ये एसुकारि ब्राम्हणाला तथागतांनी श्रावस्ती येथील अनाथपिण्डीकाच्या जेतवन आरामात उपदेश दिला त्याचा मतितार्थ पुढीलप्रमाणे आहे. एसुकारि ब्राम्हण तथागतांना भेटण्यासाठी श्रावस्ती येथील जेतवनात भेटण्यासाठी गेल्यावर तथागतांना वंदन करून एका बाजूला बसला क्षेमकुशल विचारल्यावर त्याने तथागतांना म्हटले की, ब्राम्हण चार प्रकारचे सेवाधर्म सांगतात. क्षत्रियाने ब्राम्हणाची सेवा करावी, वैश्याने व शूद्राने ब्राम्हणाची सेवा करावी, क्षत्रियाने क्षत्रियाची, वैश्याने वैश्याची व शूद्राने क्षत्रियाची सेवा करावी, ब्राम्हण वैश्याने वैश्याची सेवा करावी, शूद्राने वैश्याची सेवा करावी शूद्राने वरील तिन्ही वर्णाची सेवा करावी व स्वतःची सेवा करावी. थोडक्यात शूद्राने वरील तिन्ही वर्णाची सेवा करावी असे ब्राम्हण सांगतात ते बरोबर आहे काय?

तथागतांनी एसूकारि ब्राम्हणाच्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले की, "मी उच्च कुळाला श्रेष्ठ म्हणत नाही किंवा निचसुद्धा म्हणत नाही. त्याचप्रमाणे रंगामध्ये उजळ असलेला श्रेष्ठ नसतो किंवा वाईटही नसतो तसेच खूप धनवान असलेल्यांनाही मी श्रेष्ठ मनात नाही किंवा वाईटही म्हणत नाही.

ब्राम्हणांपैकी काही प्राणीहिंसा करतात, चोरी करतात, व्यभिचार करतात, खोटे बोलतात आणि मादक पदार्थाचे सेवन करतात त्यामुळे उच्च वर्णात, उच्च कुळात जन्म झाला म्हणून वरील पाच वर्तनापैकी कोणतेही वर्तन केल्यास ते त्याचे वर्तन अधर्मामध्ये येते. त्यामुळे उच्च वर्ण अथवा उच्च कुळापेक्षा शील-सदाचाराचे जीवन श्रेष्ठ आहे.

*"न जटाहि न गोत्तेहि न जच्चा होति ब्राम्हणो ।*

*यम्हि सच्चश्च धम्मोच सो सुची सो च ब्राम्हणो" ॥*[६]

अर्थात- "जटांनी, गोत्राने, जन्माने कुणी ब्राम्हण ठरत नाही, ज्याच्या ठायी सत्य आणि धर्म आहे, तो पवित्र होय आणि तोच ब्राम्हण होय."

जटा वाढविल्याने, ब्राम्हणकुळाचे गोत्र आहे म्हणून किंवा ब्राम्हण आई-बापाच्या पोटी जन्म घेतला म्हणून कोणी ब्राम्हण होत नाही. तर शील-सदाचाराचे आचरण करून धर्माचे पालन करतो, विनयाचे पालन करतो, त्यालाच ब्राम्हण म्हटले जाते, तोच ब्राम्हण आहे.

राजगृह येथे सुनित नावाचा साफ-सफाई करणारा कामगार राहत होता. एका दिवशी सकाळी तथागत भिक्खुसंघासह चारिका (भिक्षाटन) करीत होते. सुनित आपले साफ-सफाईचे काम करीत होता. रस्ता झाडीत, कचऱ्याचे व घाणीचे ढीग गोळा करीत टोपलीत भरून हातगाडीमध्ये टाकून ओढीत नेत होता. भगवान बुध्द व त्यांचा भिक्खुसंघ त्याच रस्त्याने येत असल्याचे सुनितने पहिले. तथागतांच्या समोर न येत लपून राहावे असे त्याला वाटले परंतु, लपण्यास जागा नसल्याने तो रस्त्याच्या बाजूला भिंतीला चिटकून उभा राहिला. भगवंतांनी त्याच्या चित्ताची अवस्था जाणली त्याला मनोमन तथागातांचे दर्शन करायचे होते. भगवान बुध्द त्याच्या जवळ आले व या दुःखी जीवनातून मुक्त व्हायचे असेल तर भिक्खु संघात सामील का होत नाहीस? असे विचारल्यावर तो लगेच तयर झाला व त्याला प्रवज्जा देण्यात आली. याप्रमाणे सुनित भिक्खुसंघाचा सदस्य झाला.

भगवान बुध्दांनी जन्मावरून व्यक्तीच्या श्रेष्ठ व कनिष्ठ या संकल्पनेला विरोध केला. त्यांनी कर्मसिद्धांत मांडला. कर्मानुसार माणूस श्रेष्ठ ठरतो असे आपल्या उपदेशातून जनसामान्यांना

*All rights reserved.*

सांगितले ते लोकांना पटलेसुध्दा त्यामुळे हजारो वर्षापासूनची वर्णव्यवस्थेची चौकट विस्कटल्या गेली. कर्माला महत्व दिल्यामुळे लोक शील-सदाचाराचे आचरण आपल्या दैनंदिन जीवनात करू लागले. त्यामुळे खालच्या वर्णात जन्मलेल्या लोकांच्या जीवनातील दुःख दूर झाले. त्यांच्या जीवनाला नवीन दिशा मिळाली. शील-समाधी व प्रज्ञेच्या मार्गाने त्यांचे जीवन सुखमय झाले. त्यांना जीवनमुक्तीचा आनंद प्राप्त झाला. जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून त्यांची मुक्ती झाली. हे सर्व भगवान बुध्दांनी मार्ग दाखविल्यामुळे व त्यांच्या अनुयायांनी तो मार्ग जीवनात अनुसरल्यामुळे शक्य झाले. या अनुयायांमध्ये ब्राम्हण होते, राजे-महाराजे, राजघराण्यातील स्त्रिया-पुरुष, राजकुमार, मंत्री त्याचा परिवार व शुद्रपण होते. बुध्द धम्मात आल्यावर सर्वांना समानतेचा दर्जा प्राप्त होत होता. त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव शिल्लक राहत नव्हता. वरील विवेचनावरून तथागत सम्यक सम्बुध्दांनी जातीव्यवस्थेचे खंडन करून कर्माने व्यक्ती श्रेष्ठ अथवा कनिष्ठ ठरते असे सप्रमाण सिध्द केले आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) बुध्दचर्या, महापंडित राहुल सांकृत्यायन, सम्यक प्रकाशन नवी दिल्ली पाचवी आवृत्ती २०११, पृष्ठ क्र.९७, ९८.

२) दिघनिकाय-१, मराठी अनुवाद, प्रा. चि. वै. राजवाडे, पुनर्मुद्रण मा. श. मोरे, द्वितीय आवृत्ती पुनर्मुद्रण २०१२, पृष्ठ क्र. १०२ ते १२९, कौशल प्रकाशन औरंगाबाद.

३) दिघनिकाय-१, २ प्रमाणे, पृष्ठ क्र. १३३ ते १४४.

४) सुत्तनिपात, मूळ पाली व मराठी भाषांतर प्रा. धर्मानंद कोसंबी, संपादक प्रा. पु. वि. बापट, कौशल्य प्रकाशन, द्वितीय आवृत्ती २०११, पृष्ठ क्र. ६७.

५) मज्झिमनिकाय, हिंदी अनुवाद, महापंडित राहुल सांकृत्यायन, समता प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्र. ४५४.

६) धम्मपद कथासार, डॉ. भ. ग. बापट, सुगत प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१२, पृष्ठ क्र. १८७.